# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com

## प्रेसनोट क्र.६२५ दिनांक ०४.०८.२०२०

## नालासोपारा पोलीस ठाणेकडुन गांजा विक्री करणा-या आरोपीतांना अटक

दिनांक ०३/०८/२०२० रोजी १८.०० वाजता नालासोपारा पोलीस ठाणे हद्दीतील सिविक सेंन्टर, नालासोपारा प. येथे आरोपीत १)आश्रफ आसीफ शेख वय-२२ वर्षे, रा.रुम नं ११३,साई दर्शन निवरास बिल्डींग,अलकापुरी नालासोपारा पुर्व ता.वसई जि.पालघर २)आकाश उमेश पाठक वय-२५ वर्षे रा. रुम नं ११, बाबा चाळ, बावशेतपाडा संतोषभुवन नालासोपारा पुर्व ता.वसई जि.पालघर यांनी काळ्या रंगाची बजाज २२० पल्सर मोटार सायकलवर कापडी पिशवीमध्ये गांजा अंमली पदार्थाचा माल विक्री करीता आपले कब्जात बाळगला असतांना मिळून आलेला आहे. आरोपीत यांचे ताब्यातुन १)३४,०००/- रु किंमतीचा १४०० ग्रॅम वजनाचा गांजा अमली पदार्थ २)१,०००-/- रु किंमतीचा नमुन्याकरीता काढुन घेतलेल्या दोन प्लॅस्टीकच्या पिशवीत प्रत्येकी २५ ग्रॅम वजन असलेला गांजा अंमली पदार्थ ३)८०,०००/- रु किंमतीची काळ्या रंगाची बजाज २२० पल्सर मोटार सायकल असा एकुण १,१५,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीत यांचे विरुध्द नालासोपारा पोलीस ठाणे गु.रजि.क्र. II २५०/२०२० एन.डी.पी.एस.कायदा १९८५ चे कलम ८(क), २०(ब), २९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील आरोपीत यांना दिनांक ०३/०८/२०२० रोजी अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी श्री.अमोल मांडवे, नालासोपारा विभाग यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक श्री.गोसावी व सहायक पोलीस निरीक्षक श्री.माने यांनी व नालासोपारा पोलीस ठाणेचे अधिकारी व कर्मचारी यांनी केली आहे.

Scanned with CamScanner